www.sarkarrajpress.com

# सरकार राज

Email: sarkarraj.gurav3@gmail.com

वर्ष : २० ❍ अंक : २८ ❍ ठाणे ❍ दि. २३ ते २९ जून २०२६ ❍ RNI No. MAHMAR/2009/34640 ❍ पाने - ४ ❍

## नमुंमपा मोरबे धरणाच्या मुख्य जलवाहिनीवरील देवद-विचुंबेतील अनधिकृत नळजोडणीवर कारवाई

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरणातून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या २०५० मि.मी. व्यासाच्या मुख्य भूमिगत जलवाहिनीवर पनवेल तालुक्यातील देवद व विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत काही व्यक्तींमार्फत अनधिकृत नळजोडणी करून पाण्याचा वापर होत असल्याची तक्रार प्राप्त झाली होती.

त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने तात्काळ घटनास्थळी पाहणी केली असता मुख्य जलवाहिनीवर सुमारे १०० मि.मी. व्यासाची अनधिकृत नळजोडणी करण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणी एप्रिल २०२५ मध्ये सदर अनधिकृत नळजोडणी महानगरपालिकेमार्फत त्वरित खंडित करण्यात आली होती. तसेच विचुंबे व देवद ग्रामपंचायतींना अनधिकृत नळजोडणीद्वारे वापरलेल्या पाण्यापोटी दंडात्मक स्वरूपाची रु. ८०,९२,५६०/- इतकी रक्कम भरण्याबाबत नोटीस बजाविण्यात आली होती. **(उर्वरीत पान २ वर)**



## महापौर व नगरसेवकांच्या अनधिकृत बांधकामावर प्रशासनाचे मौन

### सत्ताधाऱ्यांना अभय देण्याचा आरोप

**नवी मुंबई :** सामान्य नागरिकांच्या घरांवरील किरकोळ अनधिकृत बांधकामांवर तत्काळ कारवाई करणारे नवी मुंबई पालिका प्रशासन सत्ताधारी लोकप्रतिनिधींच्या कथित अनधिकृत बांधकामाबाबत मात्र संशयास्पद शांतता बाळगत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते महादेव पवार यांनी केला आहे. नेरूळ सेक्टर १८ येथील एकता सोसायटीतील नगरसेवक सुरज बाळाराम पाटील यांच्या मालकीच्या सदनिकेत तसेच सेक्टर १० येथील **(उर्वरीत पान २ वर)**

**“ ‘कायदा सर्वांसाठी समान आहे की फक्त सर्वसामान्यांसाठी?’ असा थेट सवाल करत या प्रकरणात त्वरित आणि निष्पक्ष कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.**

**- महादेव पवार (शिवसैनिक), नवी मुंबई**

## पुनर्विकास प्रकल्पातील मिक्सर ट्रक गृहनिर्माण संकुलात घुसला

### ब्रेक निकामी झाल्याने अपघात अरुंद रस्त्यांचा धोका पुन्हा अधोरेखित

**नवी मुंबई :** वाशी सेक्टर ९ मधील एका पुनर्विकास प्रकल्पाच्या ठिकाणाहून निघालेला पूर्ण भरलेला काँक्रीट मिक्सर ट्रक सोमवारी शेजारील जेएन-४ गृहनिर्माण संकुलात घुसला. ट्रकचे ब्रेक निकामी झाल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, अशी माहिती जेएन-४ गृहनिर्माण संस्थेचे सचिव विनय तलाटी यांनी दिली.

स्थानिक रहिवाशांच्या मते, चालक माजी जेएन-२ वसाहतीतील अरुंद रस्त्यावरून ट्रक मागे घेत चढाच्या रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न करत असताना त्यावरील नियंत्रण सुटले. हा पुनर्विकास प्रकल्प गोदरेज प्रॉपर्टीज कंपनीकडून राबविला जात आहे. हा रस्ता अत्यंत अरुंद असून येथे बांधकामाशी संबंधित अवजड वाहनांची नेहमीच वर्दळ असते, असे तलाटी यांनी सांगितले. स्वयंपाकघर या रस्त्याकडे असल्याने अवजड वाहनांची वर्दळ पाहून नेहमीच भीती वाटायची, असे रहिवासी विभा स्युनरी यांनी सांगितले.

पर्यावरण कार्यकर्ते आणि ह्युमन चेन ऑनलाइन मंचाचे समन्वयक बी. एन. कुमार यांनी सांगितले की, अवजड बांधकाम वाहनांसाठी पुरेशी वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे ही विकासकांची जबाबदारी आहे. जिथे आवश्यक असेल तिथे विकासकांनी रस्ते रुंद करावेत आणि नागरी प्रशासनाने सुरक्षा नियमांची कठोर अंमलबजावणी करावी. अन्यथा अशा प्रकारचे अपघात इतर पुनर्विकास प्रकल्पांमध्येही घडू शकतात, असे कुमार यांनी सांगितले.

या घटनेमुळे अपुऱ्या रस्ते सुविधांसह दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये सुरू असलेल्या पुनर्विकास प्रकल्पांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नव्या नियुक्त्या

### महिला जिल्हाध्यक्ष, ऐरोली विधानसभा अध्यक्ष व जिल्हा सरचिटणीस पदांची घोषणा

**नवी मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवी मुंबई शहर जिल्हा शाखेत संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्यासाठी महत्त्वाच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. नवी मुंबई जिल्हाध्यक्ष भारत जाधव यांनी नियुक्तीपत्र देत पक्षातील विविध पदावर नव्या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर केली.



यामध्ये एका महिला कार्यकर्त्यांची नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्ष (प्रभारी) म्हणून नियुक्ती करण्यात आली असून प्रसाद जगन्नाथ घोरपडे यांची नवी मुंबई ऐरोली विधानसभा अध्यक्षपदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच एका कार्यकर्त्याची नवी मुंबई जिल्हा सरचिटणीस पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीपत्रात पक्षाची विचारधारा आणि ध्येयधोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी नव्या पदाधिकाऱ्यांनी सक्रियपणे कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. तसेच सर्व नियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## आरोग्यप्रेमी नागरिकांच्या एकत्रित उदंड सहभागातून आंतरराष्ट्रीय योग दिन नवी मुंबईत उत्साहात साजरा

**नवी मुंबई :** आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सिडको आणि द आर्ट ऑफ लिव्हींग यांच्या सहकार्याने वाशी येथील सिडको प्रदर्शनी केंद्रात आयोजित योगविषयक विशेष कार्यक्रमात विविध वयोगटातील ५ हजाराहून अधिक नागरिकांनी सहभागी होत ‘स्वच्छतेतून आरोग्य व आरोग्यासाठी योग’ असा संदेश व्यापक स्वरूपात प्रसारित केला.



याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे वन मंत्री ना. गणेश नाईक, नवी मुंबईच्या महापौर श्रीम. सुजाता पाटील, बेलापूर विधानसभा सदस्य आमदार श्रीम.मंदाताई म्हात्रे, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, कार्यक्रमाचे निमंत्रक क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे सभापती गिरीश म्हात्रे व उपसभापती राजू मढवी, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, शिक्षण विभाग उपआयुक्त श्रीम.संघरत्ना खिल्लारे, क्रीडा विभाग उपआयुक्त श्रीम.अभिलाषा म्हात्रे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, कार्यकारी अभियंता राजेश पवार, प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या शिलादिदी, द आर्ट ऑफ लिव्हींगचे रत्नेश्वर शेटये, योग प्रशिक्षक प्रमोद कोकणे व श्रीम.दिप्ती देशपांडे आदी मान्यवर तसेच इतर अधिकारी, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मानसिक शांती **(उर्वरीत पान २ वर)**

# वृक्षप्राधिकरण समितीच्या स्थापनेला मंजुरी; पर्यावरण तज्ज्ञांच्या समावेशाचा मार्ग मोकळा

**नवी मुंबई (प्रतिनिधी):** शहरातील वृक्षसंपत्तीचे संरक्षण, हरित क्षेत्रांचे संवर्धन आणि वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या महासभेत वृक्षप्राधिकरण (ट्री ऑथॉरिटी) स्थापन करण्याच्या प्रस्तावाला सोमवारी (ता.२२) बहुमताने मंजुरी देण्यात आली. या चर्चेदरम्यान समितीत पर्यावरण व वृक्षसंवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करण्याची माजी महापौर तथा भाजपचे नगरसेवक सुधाकर सोनवणे यांनी केलेली सूचना देखील सभागृहाने मंजूर केली. त्यामुळे भविष्यात वृक्षप्राधिकरणाच्या निर्णयप्रक्रियेत लोकप्रतिनिधींसोबत विषयातील जाणकारांचाही सहभाग राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.


वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५ अंतर्गत प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रात वृक्षप्राधिकरण स्थापन करण्याची तरतूद आहे. त्यानुसार नवी मुंबई महापालिकेने हा विषय महासभेसमोर मंजुरीसाठी सादर केला होता. सभागृह नेते सागर नाईक यांनी हा विषय सभागृहात मांडला. शहरातील वाढते नागरीकरण, रस्ते व विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे वृक्षसंवर्धनाचा प्रश्न अधिक महत्त्वाचा बनला असून वृक्षतोड, पुनर्लागवड, वृक्षगणना, हरित क्षेत्रांचे नियोजन आणि पर्यावरण संरक्षणाशी संबंधित बाबींवर निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा आवश्यक असल्याचे प्रशासनाने प्रस्तावात नमूद केले होते. चर्चेदरम्यान, सुधाकर सोनवणे यांनी वृक्षप्राधिकरण ही शहराच्या पर्यावरणीय भवितव्याशी निगडित महत्त्वाची समिती असल्याचे सांगितले. समितीत केवळ सभागृहातील सदस्यांचा समावेश न ठेवता वृक्षसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि जैवविविधता क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींनाही स्थान देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. वृक्षप्राधिकरण स्थापनेचा मूळ प्रस्तावही बहुमताने मंजूर करण्यात आला. त्याचसोबत वृक्षप्राधिकरणासाठी सदस्यांची नियुक्ती करण्यासही महासभेत मंजुरी देण्यात आली. या समितीत महापालिकेतील दहा सदस्यांचा समावेश करण्यात आला असून पुढील आदेशापर्यंत अथवा नियमानुसार नव्याने नियुक्ती होईपर्यंत या नियुक्त्या लागू राहतील.

## पर्यावरण संतुलन राखण्याचे आव्हान

शहरातील वृक्षसंपत्तीचे संरक्षण आणि विकासकामांमुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय परिणामांचा विचार करून निर्णय घेण्यात या प्राधिकरणाची महत्त्वाची भूमिका राहणार आहे. तसेच महापालिका आयुक्तांना आवश्यक प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाही पूर्ण करून वृक्षप्राधिकरण कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. नवी मुंबईत गेल्या काही वर्षांत विविध विकास प्रकल्प, रस्ते रुंदीकरण आणि पायाभूत सुविधा उभारणीच्या कामांमुळे वृक्षतोडीचे विषय वेळोवेळी चर्चेत आले आहेत. अशा परिस्थितीत वृक्षप्राधिकरण अधिक सक्रियपणे कार्यरत राहून वृक्षसंवर्धन आणि विकास यांच्यात संतुलन राखण्याचे आव्हान या नव्या यंत्रणेसमोर असणार आहे.

# सर्व ओपन जीमवर पत्रा शेड उभारण्याची मागणी

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने व सार्वजनिक ठिकाणी उभारण्यात आलेल्या सर्व ओपन जिमवर संरक्षणात्मक पत्रा शेड उभारण्यात यावे, अशी मागणी शिवसैनिक महादेव पवार यांनी महानगरपालिकेकडे केली आहे.



महानगरपालिका सध्या अनेक उद्यानांमधील बसण्यासाठी असलेल्या बेंचवर पत्रा शेड उभारण्याची कामे करीत आहे. मात्र, नागरिकांच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या ओपन जिम सुविधा अजूनही पूर्णपणे खुल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे पावसाळ्यात नागरिकांना व्यायाम करणे अशक्य होत असून अनेक ठिकाणी ओपन जिम वापराविना पडून राहत आहेत.

विशेषत: महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नियमित व्यायाम करणाऱ्या नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय पाऊस, उन्हाचा तीव्र संपर्क आणि बदलत्या हवामानामुळे ओपन जिममधील लोखंडी साहित्य गंजून खराब होत असून लाखो रुपयांच्या सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत आहे.

# नगरसेवकांच्या अनधिकृत बांधकामांवर प्रशासनाचे मौन

(पान १ वरून)

एकता अपार्टमेंटमधील महापौर सौ. सुजाता सुरज पाटील व सुरज पाटील यांच्या संयुक्त मालकीच्या सदनिकेत नियमबाह्य व अनधिकृत बांधकाम झाल्याची तक्रार महापालिकेकडे पुराव्यांसह करण्यात आली आहे. यासंदर्भात १० एप्रिल व १३ मे २०२६ रोजी लेखी तक्रारी देऊनही प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही.

महापौर आणि नगरसेवक या दोन्ही पदांवर असलेल्या लोकप्रतिनिधींनी निवडणूक अर्जामध्ये संबंधित बांधकामांची माहिती जाहीर केली होती का, याबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. जर माहिती लपविण्यात आली असेल तर तो निवडणूक आयोग व प्रशासनाची फसवणूक करण्याचा गंभीर प्रकार ठरू शकतो, असे पवार यांनी म्हटले आहे.

विशेष म्हणजे संबंधित लोकप्रतिनिधी हे राज्याचे वनमंत्री मा. गणेश नाईक यांचे निकटवर्तीय मानले जात असल्याने प्रशासनावर राजकीय दबाव आहे का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. सामान्य नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करणारे प्रशासन या प्रकरणात मात्र गप्प का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.

महादेव पवार यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडे संबंधित सदनिकांची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून चौकशी करण्याची, दोषी आढळल्यास अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याची तसेच आवश्यक असल्यास पद अपात्रतेची प्रक्रिया सुरू करण्याची मागणी केली आहे.

# जलवाहिनीवरील अनधिकृत नळजोडणीवर कारवाई

(पान १ वरून)

त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये मुख्य जलवाहिनीवरील ब्रेकडाऊन दुरुस्तीच्या वेळी त्याच ठिकाणी पुन्हा अनधिकृत नळजोडणी करण्यात आल्याचे आढळून आले. सदर जोडणी खंडित करण्यासाठी महानगरपालिकेने कारवाई हाती घेतली असता काही स्थानिकांकडून विरोध करण्यात आला. त्यामुळे त्या वेळी सदर जोडणी खंडित करणे शक्य झाले नाही. तसेच देवद व विचुंबे ग्रामपंचायतींना सदर अनधिकृत जोडणी त्वरित काढून टाकण्याबाबत व दंडात्मक रक्कम भरण्याबाबत नोटीस देण्यात आली होती. तथापि, त्यांच्याकडून कार्यवाही करण्यात आली नाही.

त्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने दिनांक २८ मार्च २०२६ रोजी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत खांदेश्वर पोलीस स्टेशन यांचेकडील पोलीस बंदोबस्तात संबंधित अनधिकृत नळजोडणी खंडित करण्यात आली.

यानंतर महानगरपालिकेच्या पथकाने केलेल्या पुढील तपासणीत याच ठिकाणी मुख्य जलवाहिनीवर पुन्हा छेडछाड करून पाण्याचा अनधिकृत वापर सुरू असल्याचे आढळून आले. अनधिकृतरित्या वापरलेल्या पाण्याबाबत दंडात्मक स्वरूपाची रु. १,१७,६१,२३९/- इतकी रक्कम भरणा करण्याबाबत जिल्हा परिषद, रायगड यांना कळविण्यात आले व सदर अनधिकृत जोडणी त्वरित खंडीत करण्यासाठी कळविण्यात आले.

मुख्य जलवाहिनीशी कोणत्याही प्रकारची छेडछाड करणे, अनधिकृत नळजोडणी करणे अथवा पाण्याची चोरी करणे हा गंभीर व दंडनीय गुन्हा आहे. अशा प्रकारच्या कृत्यांमुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होण्याबरोबरच नवी मुंबई शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊन नागरिकांच्या पाणीपुरवठा सुरक्षेलाही धोका निर्माण होऊ शकतो. सदर प्रकार तिसऱ्यांदा निदर्शनास आल्याने प्राप्त माहितीच्या आधारे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत खांदेश्वर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३२६(अ), १२५, ३२४, ३(५) तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम, १९८४ मधील कलम ३(२)(म) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिन नवी मुंबईत साजरा

(पान १ वरून)

व शारीरिक क्षमतावृध्दी करणाऱ्या योगाचे महत्व केवळ भारतातच नाही तर संपूर्ण जगातील विविध देशांमधल्या लोकांना समजले असल्याचे सांगतवन मंत्री ना.गणेश नाईकयांनी केवळ आजच्या योग दिनापुरते नाही तर वर्षाचे ३६५ दिवस योगासनांच्या माध्यमातून प्रत्येकाने आपले आरोग्य जपावे असे आवाहन केले. माणसाचे मन शुध्द व संतुलित करणाऱ्या आणि संयमाचे महत्व अधोरेखित करणाऱ्या योगाचे महत्व पंतप्रधान ना.नरेंद्र मोदी यांनी योग दिनाच्या माध्यमातून जगभरात वृध्दींगत केले असे ते म्हणाले. योगाव्दारे मनाची व शरीराची निगा राखण्याप्रमाणेच पर्यावरणाचा समतोल राखण्याचीही गरज त्यांनी विशद केली.

नवी मुंबईच्या महापौर श्रीम. सुजाता पाटील यांनी आदीनाथ शंकरांपासून योगविद्येची सुरूवात झाली असा उमगाचा उल्लेख करीत ऋषीमुनींपासून पुढे चालत आलेले हे योग ज्ञान आपल्या आरोग्यासाठी अतिशय महत्वाचे असल्याचे सांगितले. योग म्हणजे केवळ व्यायामाचा प्रकार नाही तर ती तनामनाची शुध्दी करणारी नियमित आचरणात आणावी अशी गोष्ट असल्याचे सांगत महापौर महोदयांनी योगाचे महत्व विशद केले.

आमदार श्रीम.मंदाताई म्हात्रेयांनी याप्रसंगी बोलताना पंतप्रधान महोदयांच्या प्रेरणेतून मागील १२ वर्षांपासून नवी मुंबईत सातत्याने योगविषयक कार्यक्रमाचे आयोजन केले जात असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. मन:शांती, प्रकृती स्वास्थ्य यांची योगाद्वारे जपणूक होतेच, शिवाय योगाच्या दैनंदिन आचरणामुळे आपण थकलेले वृध्द होत नाही तर मनाने नेहमी तरूण राहतो अशीही वस्तुस्थिती त्यांनी व्यक्त केली.

विशेष म्हणजे वनमंत्री, महापौर, आमदार, आयुक्त व उपस्थित मान्यवरांनी नागरिकांसह योगक्रियेत प्रत्यक्ष सहभाग घेतला.

द आर्ट ऑफ लिव्हींगचे प्रशिक्षक श्री.प्रमोद कोकणे व श्रीम.दिप्ती देशपांडे यांनी सहजसाध्या पध्दतीने योगक्रिया करून घेतल्या तसेच प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्व विद्यालयाच्या शिलादिदी यांनी मन:शांतीची प्रात्यक्षिके करून घेतली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे वृक्षरोपांच्या कुंड्या व योगविषयक ग्रंथभेट देऊन पर्यावरणस्नेही स्वागत करण्यात आले.

# मालकी भूखंडावरील सिडकोने अतिक्रमण हटविले

**नवी मुंबई (प्रतिनिधी):** सिडकोच्या माध्यमातून अतिक्रमणावर धडक कारवाईचे सत्र सुरू आहे. त्यानुसार सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (न.मुं) विभागामार्फत २२ जून रोजी ऐरोली (ईश्वरनगर) नोड येथे निष्कासन मोहिम राबवण्यात आली.

सिडको संपादित जागेवरील सर्व्हे नंबर मौजे-दिघा १३ व १४ येथील सिडकोच्या संपादित जागेवर बांधलेल्या तळमजला अधिक ३ मजले या इमारतीचे निष्कषण करण्यात आले. सदर इमारतीमध्ये अनघा बँक्वेट हॉल या नावाने व्यावसायिक वापर होत होता. अतिक्रमण सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करुन व कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आले असल्यामुळे निष्कासित करण्यात आले.

सदरची मोहीम मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार, प्रशांत भांगरे (मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली सूर्यकांत राठोड नियंत्रक (अनधिकृत बांधकामे विभाग, ऐरोली) महेश तोटावार (भूमापक ऐरोली) तसेच अतिक्रमण विभागाचे कर्मचारी, स्थानिक पोलिस अधिकारी व सिडको पोलीस पथक, महावितरण विभागाचे अधिकारी, सिडको सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्या उपस्थितीत राबविण्यात आली.



## १४ वर्षांनंतर सिडकोला आली जाग

**नवी मुंबई शहराचे शिल्पकार म्हणून गवगवा करणऱ्या सिडको प्राधिकरणाकडून अतिक्रमणावर कारवाईचा सपाटा सुरू आहे. मात्र, याच सिडको प्राधिकरणाने दिघा प्रभागातील ईश्वरनगर येथील सिडको मालकीच्या भूखंडावर ठाण मांडून बसलेल्या एका मंगल कार्यालयावर कारवाई केली आहे. विशेष म्हणजे १४ वर्षांनंतर सिडकोने कारवाई केल्याने स्थानिक नागरिक धास्तावले आहेत. दिघा परिसरात अनेक भुखंड सिडकोच्या मालकीचे आहेत. त्यावर कधी हातोडा पडणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

# स्वच्छता मोहीमांसोबतच कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती



**नवी मुंबई :** स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ च्या अनुषंगाने दि. १५ ते ३० जून २०२६ या कालावधीत नवी मुंबई पालिका क्षेत्रातील सर्व रेल्वे स्टेशन, सायन पनवेल हायवे, झोपटपट्टी भाग, गाव/गावठाण क्षेत्र, तलाव व खाडीकिनारे, सार्वजनिक शौचालये, स्वच्छता लक्ष्य युनिट अशी दुर्लक्षित क्षेत्रे, इमारतींच्या मागील बाजूस असलेल्या अरूंद गल्ल्या इ. ठिकाणी व्यापक स्वरूपात विशेष स्वच्छता मोहिमा राबविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

त्याचसोबत घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता घरापासूनच चार प्रकारे कचरा वर्गीकरण करणे तसेच मोठ्या सोसायट्या, संस्था यांनी आपल्या आवारातच दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ८ विभाग कार्यालय क्षेत्रात एजी एन्व्हायरो व परिसर सखी या संस्थांच्या माध्यमातून सोसायट्या आणि संस्था, वाणिज्य संस्था तसेच घरोघरी जाऊन जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये घरगुती स्तरावर ओला, सुका, घरगुती घातक आणि सॅनिटरी कचरा अशा ४ प्रकारे कचरा वर्गीकरण करणेबाबत तसेच हा वर्गीकृत कचरा कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये वेगवेगळा देणेबाबत माहिती देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणा-या सोसायट्या, संस्था यांनी आपल्या आवारात कचऱ्याची आपल्यामार्फतच विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने स्वत:च असा प्रकल्प उभारावयाचा आहे याविषयी सूचित करण्यात येत आहे.

# वाशीत पोलिसावर झालेल्या हल्ल्याचा महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेतर्फे निषेध

**नवी मुंबई (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना नवी मुंबई कार्यकारणीतर्फे वाशी महानगरपालिका रुग्णालयात पोलिसावर झालेल्या हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यात आला. महानगरपालिका रुग्णालयामध्ये घरगुती वादातून एका महिलेचा मृत्यू झाला होता. मृत महिलेच्या कुटुंबीयांचे म्हणणे असे होते की हा मृत्यू मनपा रुग्णालयाच्या प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे झालेला आहे व या कारणास्तव रुग्णालय प्रशासन व मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांमध्ये वाद झाला हा वाद मिटविण्याकरिता पोलिस मध्यस्थी करण्यास गेले असता पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला करण्यात आला या हल्ल्यात एक पोलीस कर्मचारी जखमी झाला असून रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत.


या निंदनीय घटनेचा त्वरित जाहीर निषेध करत महाराष्ट्र पोलीस बॉईस संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. राहुल दुबाले यांच्या आदेशानुसार नवी मुंबई जिल्हाध्यक्ष मा. राजकुमार कारंडे यांनी वाशी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चांदेकर साहेब यांना त्वरित संपर्क साधून जखमीची विचारपूस केली व हल्लेखोर आरोपीला कडक शासन करण्यात यावे, अशी मागणी केली वारंवार पोलिसांवर होणाऱ्या हल्ल्यांचा समाचार महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेतर्फे घेतला जाईल. संघटना आता शांत बसणार नाही असा गंभीर इशारा देण्यात आला. महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेची संबंधित प्रशासनाकडे ठाम मागणी आहे की, या प्रकरणातील आरोपींवर तात्काळ व कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात.

यावेळी नवी मुंबई कार्यकारणी च्या वतीने लेखी निवेदन वाशी पोलीस स्टेशनला देण्यात आले.

# नवी मुंबई परिवहन व्यवस्थापकांच्या नियुक्तीवरुन सभागृहात वांदग

**नवी मुंबई (प्रतिनिधी) :** नवी मुंबई महापालिका परिवहन समितीचे व्यवस्थापक योगेश कडुसकर यांची नगरविकास विभागाकडून शुक्रवार १९ जून रोजी तडकाफडकी बदली करण्यात आली. या बदलीनंतर आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी प्रभारी भागवत डोईफोडे यांची त्या जागी नियुक्ती केली आहे. यावरुन सभागृह नेते सागर नाईक यांनी महासभेत गदारोळ केला. प्रशासनाने कोणत्या नियमानुसार पालिका आयुक्तांनी परिवहन व्यस्थापकपदी भागवत डोईफोडे यांची नियुक्ती केली? असा प्रश्न उपस्थित केला.

पालिका आयुक्तांना परिवहन व्यवस्थापकांची नियुक्ती करण्याचा अधिकार नसल्याचे सागर नाईक यांनी स्पष्ट केले. यावेळी सभागृहात अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांनी ही नियुक्ती तात्पुरती असल्याचे वारंवार सभागृहाला सांगितले. पण सभागृहाकडून कोणत्या नियमानुसार केली अशी विचारणा केल्यांनतर अखेर डॉ.राहुल गेठे यांनी ही नियुक्ती चुकीच्या पध्दतीने झाली असल्याचे मान्य केल्यांनतर यावरील वांदग संपुष्टात येईल. परिवहन सदस्य राहुल शिंदे यांनी परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले मुख्य वाहतुक आधिकारी उमाकांत जंगले यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४१ (३) नुसार परिवहन व्यवस्थापक म्हणून शासनाकडून परिवहन व्यवस्थापक या पदावर प्रतिनियुक्तीने आधिकारी उपलब्ध होईपर्यंत नेमणूक करण्यास सर्वसाधरण सभेची मुंजरी मिळावी यासाठी ठराव मांडला होता. हा ठराव सभागृह नेते सागर नाईक यांनी सभागृहासमोर उपस्थित केल्यांनतर शिवसेनेचे नगरसेवक शिवराम पाटील यांनी परिवहन सदस्य राहुल शिंदे यांच्या मागणीवरुन ठराव कसा घेऊ शकतात. असा प्रश्न उपस्थित केला.



यावेळी सभागृह नेते सागर नाईक हा ठराव राहुल शिंदे कडून नाही तर सचिव विभागांकडून आला असल्याचे स्पष्ट केले. तर सागर नाईक यांनी प्रशासनाला धारेवर धरत प्रशासनाने भागवत डोईफोडे यांची नियुक्ती कोणत्या कलमांअतंर्गत केली असा सवाल उपस्थित केला. यावरुन अतिरिक्त आयुक्त डॉ.गेठे यांनी प्रशासनाकडून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती केले असल्याचे स्पष्ट केले. पण कोणत्या कलमांअर्तगत केली असा सवाल सभागृह नते सागर नाईक यांनी वारवारं उपस्थित करुन प्रशासनाला कात्रीत पकडले. अखेर अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांनी प्रशासनाकडून चुकीच्या पध्दतीने निवड झाल्याचे मान्य केल्यांनतर या विषयावर पडदा पडला. तर परिवहन समितीने देखील यांची तत्काळ बैठक घेत उमांकात जंगले यांची नियुक्ती केली आहे.

# बेलापूरमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**नवी मुंबई :** बेलापूर प्रभाग क्र. २७ येथे आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त आयोजित योग शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराला मा. आमदार संदीप नाईक, महापौर सुजाता सुरज पाटील तसेच योग संगम भारतीय योग संस्था, योग प्रशिक्षक आणि भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

योग संगम भारतीय योग संस्था यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या शिबिरात योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठीचे महत्त्व पटवून देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी







सहकार्य करणाऱ्या सर्वांचे समाजसेविका सौ. तेजस्वी कुंदन म्हात्रे यांनी आभार मानले व नागरिकांनी नियमित योग करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. भारतीय योग सवस्ता - मुक्ता ताई, विशाखा शिंदे विस्तार फाउंडेशन यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम पार पडला.

## नेरुळ येथील राजमाता जिजाऊ गार्डन व तानाजी मालुसरे मैदानाची दुरावस्था; आयुक्तांच्या पाहणीची मागणी

**नवी मुंबई :** नेरुळ सेक्टर ६ येथील राजमाता जिजाऊ गार्डन व तानाजी मालुसरे मैदान येथील विविध सुविधांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. गटारावरील तुटलेली झाकणं, उंदरांचा वाढता सुळसुळाट, मोडकळीस आलेले प्रवेशद्वार, निकामी पाणपोई, तुटलेले झोपाळे, खराब बसण्याची व्यवस्था तसेच परिसरात साचलेला कचरा आणि खराब अवस्थेतील कचराकुंड्या यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा व आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.या पार्श्वभूमीवर शिवसैनिक महादेव पवार यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वत: या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी दौरा करून परिस्थितीची पाहणी करावी व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ दुरुस्ती, स्वच्छता आणि आवश्यक कारवाईचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे.

नागरिकांच्या करातून उभारण्यात आलेल्या सार्वजनिक सुविधांची अशी दुरावस्था होणे दुर्दैवी असून उद्यान व मैदान त्वरित सुस्थितीत आणून नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिवसैनिक महादेव पवार यांनी केली आहे.

## येतोय पावसाळा! कोकण रेल्वेची यंत्रणा सज्ज

**नवी मुंबई :** मागील वर्षी पावसाळ्यात कोकण रेल्वेच्या प्रवाशांना झालेल्या त्रास पाहता.यंदा कोकण रेल्वे अत्याधुनिक यंत्रणांनी पावसाळ्यातील आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी सज्ज झाली आहे, अशी माहितीकोकण रेल्वेचे व्यवस्थापकीय संचालक तथा प्रकल्प निर्देशक संतोष कुमार झा यांनी दिली. कोकण रेल्वेने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर उपाय योजनाचा आढावा पत्रकार परिषदेत दिला. यावेळी सुनील नारकर (मुख्य जनसंपर्क अधिकारी) उपस्थित होते. कोकणात दरवर्षी होणारा मुसळधार पाऊस आणि दरड कोसळण्याच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वे पूर्णपणे सज्ज झाली आहे.

मान्सून पूर्व तयारीचा आढाव्याची माहिती देताना संतोष कुमार झा म्हणाले की, १५ जून ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विशेष तयारी केली आहे. मागील चार महिन्यांपासून ७०० कर्मचारी २४ तास ट्रॅक मॉ निटरिंगचे काम करीत आहेत. सर्व रेल्वे स्थानकांवर आपत्कालीन यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. हॉस्पिटल, रुग्णवाहिका, ट्रॅक दुरुस्ती पथक सज्ज झाली आहेत.

मान्सूनच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वे मार्गावरील संवेदनशील आणि धोकादायक ठिकाणांची विशेष दुरुस्ती करण्यात आली आहे. दरडी कोसळण्याची शक्यता असलेल्या भागांमध्ये संरक्षक उपाययोजना राबविण्यात आल्या असून जमिनीची मजबुतीकरणाची कामे करण्यात आली आहेत.

प्रवाशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने देखील पावले उचलण्यात आली आहेत.

## दलित अधिकाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात वंचित व रिपब्लिकन सेनेचा आंदोलनाचा इशारा

**नवी मुंबई :** १९ जुनरोजी झालेल्या नवी मुंबई पालिका महासभेमध्ये विधी अधिकारी मा.अभय जाधव यांना पाचारण करून न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणात चर्चा करणेस योग्य नाही हे कायदेशीर तरतूद सभागृहाला सांगितले असता, त्यांना निलंबित करण्याची मागणी सत्ताधारी पक्षाकडून करण्यात आली होती. या विरोधात पालिकेमधील दलित व मागासवर्गीय प्रामाणिक अधिकारी व कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या भेदभावासंदर्भात आज वंचित व रिपब्लिकन सेने व इतर संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला. यावेळी आंदोलनकर्त्यांना गेटवर अडवण्यात आले. त्यावेळी कार्यकर्त्यांनी गेटवरच पालिकेच्या विरोधात घोषणाबाजी सुरु केली.



विधी अधिकारी मा.अभय जाधव यांच्या बाबतीत घडलेला हा प्रकार जाणीवपूर्वक मागासवर्गीय अधिकारी कोणत्या तरी मार्गाने लक्ष्य करून निलंबनाच्या फेऱ्यात अडकवण्याचा हेतू आहे. या आधिही अनेक मागासवर्गीय अधिकारी यांना लक्ष्य करून निलंबित केले आहे. अथवा त्यांना पदोन्नती पासून दूर ठेवले आहे. मा. अभय जाधव याना देखील जातीवाद करून निलंबित करण्याची मागणी करण्यात आली आहे. हा जातीवाद येथील आंबेडकरी जनता आणि वंचित बहुजन आघाडी सहन करणार नाही असा स्पष्ट आरोप वंचितचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अश्वजित जगताप यांनी केला आहे.

त्याचबरोबर संपूर्ण महाराष्ट्रात सर्व महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा आहे परंतु आजतागायत नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा नाही.

हा देखील जाणीवपूर्वक केलेला जातीवाद असल्याचा आरोप रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष दिपक पहूरकर यांनी केला आहे.

तरी अद्याप विधी अधिकारी मा. अभय जाधव यांचा बाबतीत ठराव आलेला नसून सद्या ते निलंबित नसून ठराव नंतर आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल असे पालिका आयुक्त यांनी सांगितले.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उलवे येथे योग दिन संपन्न



**नवी मुंबई :** उलवे :आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी, उलवे आणि जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ७.३० वाजता खारकोपर तलाव, उलवे येथे योग दिन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला नागरिक, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच योगप्रेमी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

भारताचे लोकप्रिय आणि यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी जी यांच्या प्रेरणेतून संपूर्ण जगभर साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमामध्ये सामूहिक योगाभ्यास, प्राणायाम आणि विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. उपस्थितांनी योगाचे महत्त्व जाणून घेत निरोगी जीवनशैलीचा संकल्प केला.

भाजप आणि जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे पदाधिकारी, जिल्हा परिषद-पंचायत समिती, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, उलवे पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी, श्री कच्छी लेवा पटेल समाजाचे सदस्य, मीना योगा ग्रुप, बुद्धिस्ट वेल्फेअर कमिटीचे पदाधिकारी व सदस्य तसेच आम्ही उलवेकर मित्र मंडळ उलवेमधील विविध सामाजिक संस्था यांच्या मोठ्या सहभागामुळे कार्यक्रमाला भव्यता प्राप्त झाली. जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम जे. म्हात्रे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

हे साप्ताहिक मालक-मुद्रक-प्रकाशक-संपादक **श्री.संजू प्रल्हाद गुरव** यांनी रोशन प्रिन्टर्स, हिरा मनिषा अपार्टमेंट, गाळा नं. ७, शिवाजी रोड, लाईन आळी, पनवेल, जि. रायगड (महाराष्ट्र) -४१०२०६ येथे छापून एसएस-२, रुम नं.२१०, सेक्टर १६, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९ येथून प्रकाशित केले. **संपादक- श्री.संजू प्रल्हाद गुरव, मुख्य कार्यालय :** बी-२४, महावीर मार्केट, से.- १८, वाशी, नवी मुंबई. **पनवेल ऑफिस :** मोरबे गाव, द्वारका हौ.सोसा.बी-६ए ०१, **भ्रमणध्वनी: ९२२०७०४०९०. कायदेविषयक सल्लागार :** श्रद्धा खाडे-शहा